नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 31/01/2024 (बुधवार) सकाळ

## जिवानिशी ठार करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत पळसाड शिवार कामठी येथे दिनांक ३१/०१/२०२४ चे ०९.३० वा. १०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— राहूल नानाजी झाडे, वय ३२ वर्ष, रा. पळसाड, ता. कामठी जि. नागपूर हे पळसाड या गावाचे पोलीस पाटील पदावर काम करतात. दि. ३१/०१/२०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता दरम्यान फिर्यादी गावातील चौकात उभा असताना गावात राहणारा पंकज कांब याने फिर्यादीला सांगितले की, सिताराम अँग्रो इंडस्ट्रीच्या मागे रोडला लागून असलेल्या नाली मध्ये एक अनोळखी माणसाचे प्रेत पडलेले आहे. अशी माहिती मिळताच माहितीची शहानिशा करण्याकरिता त्या ठिकाणी फिर्यादी गेले असता सिताराम अॅग्रो इंडस्ट्रीच्या मागे रोडच्या बाजुला असलेल्या श्री आसवले यांच्या शेतालगतच्या नालीमध्ये पाहिले असता नाली मध्ये एका इसमाचे प्रेत मृत अवस्थेत पडलेले दिसून आले. फिर्यादीने डायल ११२ वर कॉल करून पोलीसांना कळविले. फिर्यादीने दुरून पाहिले असता त्या मृत इसमाचे गळयाजवळ एक खोल जखम व इतरही जखमा दिसल्या, त्याचे अंगात निळसर रंगाचा टि—शर्ट व काळया रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. फिर्यादी सोबत असलेल्या गावकऱ्यांना विचारले असता त्याला कोणीही ओळखत नसून तो या परिसरातील राहणारा नाही. त्याचे वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष आहे. सदर अनोळखी इसमास कोणीतरी अज्ञात इसमांनी व अज्ञात कारणाने धारदार शस्त्राने वार करून जिवानिशी ठार करून रात्री दरम्यान सिताराम अॅग्रो इंडस्ट्रीच्या मागे रोडच्या बाजुला असलेल्या श्री आसवले यांच्या शेतालगतच्या नालीमध्ये फेकून दिले आहे.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान सदर गुन्हयातील अनोळखी मृतक व्यक्तीचे नाव अरविंद वसंत पंधरे, वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष रा. झरगड, ता. राळेगाव, जि. यवतमाळ असे निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. पराग पोटे यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. पराग पोटे मो. नं. ९३७०६३१३२७ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा खापा बडेगाव ते पारशिवनी रोड चे टर्निग च्या बाजुला दिनांक ३०/०१/२०२४ चे २३.०० वा. ते ०८.०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादी नामे– सुरेश गंगाराम अवजेकर वय ५४ वर्ष रा गडेवाल पुरा प्रभाग क्र १ खापा ता सावनेर जि नागपुर यांचे भोजनालयाचे दुकानाचा दरवाजा तोडुन भोजनालयाचे दुकानाचे आत प्रवेश करुन १) दुकानाचे ड्रावरमधुन अंदाजे १००० रु चिल्लर, २) एल. सी. डी टीव्ही किंमती अंदाजे ५०००/– रुपये, ३) एक १० किलो तेलाची कॅन प्रती १००/– रु किलो प्रमाणे एकुण १००० रु, ४)तांदळाचा कट्टा ३० किलो किंमती १८००/– रु चा व ५) इतर किरकोळ माल अंदाजे १०००/– रु चा माल असा एकुण ९८००/– रुपयाचा मुद्देमाल चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस हवालदार मरकाम यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा बनाफर मो. नं. ९७६७४१८४१४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**